# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेसनोट २७६ - २२** **दिनांक १४/०९/२०२२**

## ऑगस्ट महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

१) नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीमध्ये अमीत सोनार शॉपिंग सेंटर, नालासोपारा पश्चिम येथे आरोपींनी ऑफिस भाडयाने घेवून परदेशात नोकरी लावण्याचे बेरोजगार गरीब मुलांना आमिष दाखवून सदर मुलांकडून पासपोर्ट तसेच गुगल पे या ॲपव्दारे पैसे घेऊन सुमारे २,००,०००/- रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेमध्ये तक्रारअर्ज प्राप्त झाला होता. सदर तक्रारींचे गांभीर्य लक्षात घेवून पिडीत मुलांकडे नमुद घटनेबाबत सखोल चौकशी करून त्यांचेकडून त्यांची फसवणुक करणाऱ्या इसमांबाबत माहिती प्राप्त करुन मिळालेल्या माहितीवरुन तसेच तांत्रिक विश्लेषणावरुन संशयित आरोपीतांचा सतत १० दिवस पाठलाग करुन बोरीवली रेल्वे स्टेशन, मुंबई येथून दिनांक ०४/०८/२०२२ रोजी इसम नामे १) दिनेशचंद्रा मालेप्रसाद प्रजापती, ऊर्फ गुड्डु आलम, वय- ३२ वर्षे, रा.अरहित अपार्टमेंट, दुसरा माळा रुम नं.२१० आनंदनगर, वसई पश्चिम, जि.पालघर २) मनोज नामदेव खंबायत, वय ३१ वर्षे, रा. गुप्ता चाळ, रुम नं. ०८, असल्फा स्टेशन घाटकोपर पुर्व, मुंबई यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडे अधिक विचारपुस केली असता त्यांनी बऱ्याच मुलांची अशाचप्रकारे फसवणूक केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरुध्द नालासोपारा पोलीस ठाणेस गु.रजि.नं. ३२९/२०२२ भा.द.वि.सं. कलम ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली होती.

सदरची कारवाई करणारे मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.नि. श्री. राहुल राख, सपोनि/अमोल आंबवणे, सपोनि दत्तात्रय सरक, पोहवा शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, पोअं/सुशील पवार, सतीष जगताप यांचा मा. पोलीस आयुक्त श्री सदानंद दाते यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **ऑगस्ट महिन्यातील गुन्हयाची उकल** याकरिता **विशेष प्रशस्तीपत्र व बक्षिस** देवून सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना पोनि. श्री राहूल राख**

२) दिनांक २७/०८/२०२२ रोजी ०३.२० वा. ते ०४.२५ वा. चे दरम्यान लिनीट एक्सपोर्ट प्रा. लि. परमार इंडस्ट्रीयल इस्टेट वसई फाटा जवळ, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर येथे फिर्यादी नामे - श्री.मनोज राणे रा. विरार प ता. वसई, जिल्हा-पालघर यांचे लिनीट एक्सपोर्ट प्रा. लि. या कंपणीत ०८ इसमांनी प्रवेश करुन वॉचमॅन यांना मारहाण करुन त्यांचे जबरदस्तीने हात-पाय बांधुन ठेवले व त्यानंतर आयशर कंपणीचा टेम्पो गेट मध्ये घेवुन त्यात त्यांनी गोडावुन मध्ये ठेवलेले स्टेनलीस स्टीलचे रॉड किंमत ३,७८,०००/- रुपये असा माल आयशर टेम्पोमध्ये भरुन जबरी चोरी करुन निघुन गेले होते. सदरबाबत पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ७२७/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३९५,३४१ प्रमाणे अज्ञात आरोपीविरुध्द दरोडयाचा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्यातील अज्ञात आरोपीतांचा शोध होण्याच्या अनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष-३ विरारचे पोलीस पथकाने वेगवेगळे पथक तयार करुन गुन्हयातील आरोपीत यांचा तांत्रीक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने माहिती प्राप्त करुन गुन्हा घडल्याच्या ३६ तासाच्या आत सापळा रचुन आरोपीत नामे - १) ब्रदीआलम मेहमुद अली खान वय - ३६ वर्षे, २) ईरशाद शौकत अली वय - ५४ वर्षे, ३) मोहम्मद रफिक इद्रीस शहा वय - २७ वर्षे, ४) मोहम्मद तोफीक शेख वय ३७ वर्षे, ५) मजहर ईरशाद अली खान वय - २१ वर्षे, ६) नजिर अहमद सोराब अली शेख वय - ४० वर्षे, ७) हाफिजउल्ला ईदउल्ला खान वय - २९ वर्षे यांना शिताफीने ताब्यात घेवून अटक केली होती.

सदर गुन्हयाचे तपासामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गुन्हे शाखा-३ विरार युनीटचे पोलीस निरीक्षक पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पोउपनिरी/ उमेश भागवत, पो.हवा/ अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारवकर, पो.ना/ मनोज सकपाळ, पो.अं./ राकेश पवार, अश्विन पाटील, सुमित जाधव सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष -३ यांचा

दिनांक १३/०९/२०२२ रोजी मा. श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **'ऑगस्ट महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल' क्रमांक-१** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना पोनि. श्री प्रमोद बडाख**

३) दिनांक ०१.०८.२०२२ रोजी काशिमिरा पोलीस ठाणे येथे तक्रारदार यांनी तक्रार दिली की, मयंक विष्णू ठाकुर वय-१३ वर्षे रा. क्लष्टर सोसायटी, बालाजी हॉटेल समोर, शांतापार्क, काशिमिरा हा दिनांक ३१/०७/२०२२ रोजी सायंकाळच्या सुमारास घराबाहेर गेला असून रात्री २२:०० वाजेपर्येत घरी आलेला नाही. त्यामुळे त्याचे कुणीतरी अज्ञात इसमाने अपहरण केलेले आहे बाबत तक्रार दिल्याने काशिमिरा पोलीस ठाणे येथे ा गुरनं ५३१/२०२२ भादंविक ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून अपहरण झालेल्या अल्पवयीन बालकाचा शोध घेण्याकरिता काशिमिरा पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने वेगवेगळया दृष्टीकोनातून तपास करण्यास सुरुवात केली. सदर गुन्हयाचा तपास चालू असतांना गुन्हयातील अज्ञात आरोपींनी अल्पवयीन बालकाच्या पालकांना फोन करुन ३५,००,०००/- (पस्तीस लाख रुपये) रुपयांची मागणी करुन तुमचा मुलगा ७ दिवसामध्ये मिळून येईल असे सांगीतले. त्यामुळे सदर गुन्हयाचे अधिक गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी काशिमिरा पोलीस स्टेशनच्या तपास पथकाला अधिक सतर्क सुचना देवून सदरचा गुन्हा तात्काळ उघडकीस करण्याबाबत सुचना व मार्गदर्शन केले. त्याअनुषंगाने तपास पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी दिवसरात्र मेहनत करुन गुप्त माहितगार व तांत्रीक मदतीच्या आधारे संशईतांबाबत माहिती प्राप्त करुन आरोपी नामे १) अफजल मोहम्मद हनीफ अन्सारी, वय-२२ वर्षे, रा. सध्या फिरस्ता, पुनमसागर, कब्रस्तानचे बाजुला मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे २) इम्रान नुरहसन शेख, वय-२५ वर्षे, रा. कुरेशीचाळ, मुन्शी कम्पाऊंड, काशिमीरा, मिरारोड पुर्व

ता. जि. ठाणे यांना सापळा रचुन ताब्यात घेतले. सदर आरोपीतांकडे कौशल्यपुर्वक विचारपुस केली असता त्यांनी यातील अल्पवयीन बालकास 'तुला फिरवून आणतो व मोबाईल फोन देतो' असे बोलून त्याय मोटारसायकलवर बसवून अपहरण केले व त्यानंतर अल्पवयीन बालकास वालीव पोलीस ठाणे हद्दीतील वासाड्या ब्रिजच्या खाली फेकून दिले मात्र सदरचा मुलगा मयत न झाल्याने त्याचे पोटावर तिक्ष्ण हत्याराने वार करुन जिवे ठार मारले. अशी प्राथमिक माहिती आरोपीतांनी दिल्याने तात्काळ त्याबाबत खात्री केली असता यातील अल्पवयीन बालकाचा मृतदेह दिनांक २/८/२०२२ रोजी मिळून आल्याने सदर गुन्हयास तपासामध्ये भादंवि ३०२, ३८७, १२० (ब) व २०१ हे वाढीव कलम लावण्यात आले आहे. सदर आरोपीतांना अटक करुन दिनांक ०२/०८/२०२२ रोजी अटक केली.

सदरचा संवेदनशिल गुन्हा उघडकीस आणण्याबाबतच्या कामगिरीबद्दल मा. पोलीस आयुक्त श्री सदानंद दाते यांनी काशिमीरा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संजय हजारे, श्री. प्रशांत गागुर्डे, सहा. पोलीस निरीक्षक, पोउपनी. श्री निखील चव्हाण, पोउपनी. श्री अमोल जाधव, पोउपनी. सागर साबळे, पोउपनी प्रकाश कावरे, सपोउपनी दिनकर कोल्हे, राजेश पानसरे, पोहवा श्रीमंत जेधे, पोना. सचिन हुले, पोकॉ. निलेश शिंदे, परेश पाटील, हनुमंत थेरवे, पोना. विश्वनाथ जरग, पोशि.सुधीर खोत, राहुल सोनकांबळे, रवि कांबळे यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **ऑगस्ट महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल क्रमांक -२** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना वपोनि श्री संजय हजारे**

४) तक्रारदार नामे पारस गांधी, रा. भाईंदर (प) हे इंटरनेटवर सर्फींग करीत असताना त्यांना लोन ॲपची जाहिरात दिसली. त्यांनी सदर ॲप डाऊनलोड करुन त्या ॲपला सर्व Permissions Allow करुन त्याद्वारे लोन घेतले. सदर लोनच्या रक्कमेपेक्षा जास्त रक्कम त्यांचेकडून घेण्यात आली व त्यांना फसवणूक होत असल्याची खात्री झाल्यानंतर त्यांनी अधिक लोन रक्कमेची मागणी केलेली नसताना त्यांना रक्कम

भरण्याकरीता आरोपीतांनी धमक्या देवून तसेच त्यांचे फोन मधील फोटो मॉर्फींग करुन त्यांचे फोन कॉन्टॅक्ट यादीतील लोकांना पाठविले. सदरबाबत तक्रारदार यांनी सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रार दिल्याने त्याबाबत कौशल्यपुर्वक तांत्रीक चौकशी करुन संशयित नामे १) दिपक क्रिपाशंकर मिश्रा, वय-२७ वर्षे, व्यवसाय - SKYLINE INTERNATIONAL IMPORT AND EXPORT रा.रुम नं १११, बि विंग, बलदेव अपार्ट,साई नगर, वसई पश्चिम, पालघर, २) विल्बर राल्फ शर्मा, वय – ३३ वर्षे, रा. ए/१५, तिसरा माळा, रोज मेरी बिल्डींग, बिच कॉम्पलेक्स, नायगाव, वसई (पश्चिम), ता.वसई,जि.पालघर ३) मनोज विदेशी शर्मा, वय ३३ वर्षे, रा.१०६, पहीला माळा, स्कॉयटेक्स बिल्डींग, वाकीपाडा, नायगाव पुर्व ता.वसई जि.पालघर, ४) महिला आरोपी वय २१ वर्षे रा. गोकुळधाम सोसा, मिनानगर, वसई (प) ता.वसई, जि.पालघर ५) रोशन पिटर डिसोजा वय २७ वर्षे रा. ई-०१, न्यु अनुराधा सोसा, आमंत्रण बार समोर, राधानगर, नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर यांचेकडे चौकशी करुन आरोपी क्र. ०१ ते ०३ यांना दिनांक ०४/०८/२०२२ रोजी व आरोपी कमांक ०४ ते ०५ यांना दिनांक ०५/०८/२०२२ रोजी ताब्यात घेवून भाईंदर पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले होते. सदर आरोपीतांविरुध्द भाईंदर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ३६८/२०२२ भा.दं.वि.स. कलम ३८४, ४२०, ३४, ५०४, ५०६ आय.टी.ॲक्ट ६६ (डी) गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरच्या कामगिरीबाबत पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, पोलीस अंमलदार/१२०९२ प्रविण आव्हाड, १२०९५/गणेश इलग, महीला पोलीस अंमलदार/ १२००७ माधूरी धिंडे, १६१०६/सुवर्णा माळी, म.सु.ब.आकाश बोरसे यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **ऑगस्ट महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल क्रमांक -३** म्हणून मा. पोलीस आयुक्त यांनी प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना पोनि श्री सुजितकुमार गुंजकर**

--------------------oooo-------------------------